अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । शनिवार
२४.१०.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २६४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

### ढोल-ताशांचा निनाद व गुलालाची उधळण करीत उत्साहात

# ‘जय माता दी’ च्या गजरात दुर्गा मातेच्या विसर्जनास सुरुवात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – ‘जय माता दी’ चा जयजयकार, ढोल ताशांचा गजर, रंगबेरंगी गुलालाची उधळण आणि जल्लोषात वरुडकरांनी दुर्गा मातेला मिरवणुकीच्या माध्यमातून निरोप देत पुढच्या वर्षी लवकर या अशी आळवणी केली. यावर्षी शहरात मध्यप्रदेश, छत्तीसगड सोबतच महाराष्ट्राच्या विविध जिल्हयातील ढोले ताशे आणि बॅन्जो पथक शोभायात्रेचे आकर्षण ठरले. नागरिकांनी अत्यंत शांततेमध्ये दुर्गा विसर्जन मिरवणुक पार पाडल्याबद्दल वरुड पोलिस व महसुल प्रशासना तर्फे सर्व मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांचे आभार व्यक्त करण्यात आले.

अ ा ज

सकाळपासूनच शहरातील ४५ दुर्गा उत्सव मंडळाचे कार्यकर्ते दुर्गा मुर्तीच्या विसर्जनात व्यस्त होते. शहरातील मुख्य मार्गाने ढोल–ताशांच्या गजरात जंगी विसर्जन मिरवणुक काढण्यात आली. रंगबेरंगी गुलालाची उधळण आणि नाचण्यात तल्लीन असलेले मंडळाचे कार्यकर्ते, ढोल–ताशे आणि बँन्जो पथक मिरवणुकीचे आकर्षण ठरत होते. त्यासोबतच काही दुर्गा उत्सव मंडळाने विसर्जनासाठी आकर्षक रथांवर दुर्गादेवीची मुर्ती विराजमान करुन याकडे नागरिकांचे लक्ष वेधले होते. ही मिरवणुक बघण्यासाठी शहरात रस्त्याच्या दुतर्फा जनसागर उसळला होता. शहरातुन निघालेली विसर्जन मिरवणुक वाजत गाजत



शहरातील मुख्य रस्त्याने फिरविण्यात येऊन महात्मा फुले चौकापर्यंत वाजत गाजत आणण्यात आली आणि सर्व दुर्गा मंडळांच्या वतीने उद्या दुसरे दिवशी शेकदरीसह इतर प्रकल्पावर दुर्गा मुर्तीचे विसर्जन करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे शहरातील मोठा भाजी बाजार परिसरातील आनंद सांस्कृतिक दुर्गा मंडळाने कोणत्याही प्रकारचा जल्लाष, बॅन्ड बाजा, ताशे न ठेवता दुपारपुर्वीच थेट देवी शेकदरी धरणावर नेवुन विसर्जीत केली आणि शिल्लक राहिलेला निधी एका रुग्णाला भेट म्हणुन दिला त्यामुळे जामा मस्जिद समोरुन विसर्जनाकरीता यावेळी केवळ ५ दुर्गा मस्जिद समोरुन विर्सनाकरीता गेल्या. यावेळी प्रशासनाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. २ वाजताच्या सुमारास नमाज पठणानंतर पहिली देवी विसर्जनाकरीता रवाना झाल्यानंतर ४ वाजताच्या सुमारास सर्वच दुर्गा मंडळाच्या मिरवणुकीने मस्जिद समोरुन अत्यंत शांततेमध्ये मार्गक्रमण केल्याने प्रशासनाने सुटकेचा श्वास सोडला.

यावर्षी शहरात विविध ठिकाणचे ढोले ताशे आणि बॅन्जो पथक मोठया प्रमाणात शोभायात्रेचे आकर्षण ठरले. मिरवणुकीदरम्यान कोणतीही अनुचित घटना होऊ नये, यासाठी पोलिसांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी तहसिलदार रविंद्र चव्हाण, नायब तहसिलदार पंकज चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील, वरुडचे नगराध्यक्ष ईश्वर सलामे, वरुडचे ठाणेदार दिनेश चव्हाण, शे.घाट ठाणेदार राहुल गवई, बेनोडा (शहीद) ठाणेदार विवेक देशमुख, मुख्याधिकारी गजानन भोयर, न.प.उपाध्यक्ष कविता उपरकर, बाधकाम सभापती जीवन मालपे, शिक्षण समिती सभापती प्राजक्ता चौधरी, आरोग्य समिती सभापती विनय खासबागे, पाणीपुरवठा सभापती अनिता पराते, नियोजन व विकास समिती सभापती पुष्पा पवार, शांतता समिती सदस्य जेष्ठ व्यापारी निळकंठ यावलकर, डॉ.गौस अली, जमील खॉ, मुकद्दरभाई, माजी नगरसेवक मो.अश्पाक, मो.नासीर, अशोक देवते, मधुकर डोंगरे, माजी नगरसेवक महेंद्र देशमुख, नगरसेवक तुषार देशमुख, किरण सावरकर, योगेश्वर खासबागे, सौरभ तिवारी, संदीप देवते, निलश दुर्गे, गौरव इंगळे, गोपी अढाऊ, मो.निसार, अन्सार बेग, नितेश धुर्वे, नगरसेविका छाया दुर्गे, ज्योती शेगेकर, मनिषा उईके, रेखा काळे, डॉ.प्रांजली कुऱ्हाडे, सिमा कानुगो, भारती माळोदे, भाग्यश्री अधव, माजी न.प.उपाध्यक्ष उमाशंकर देशमुख, प्रभाकर काळे, राजु मानकर, मनिष कुबडे, निखिल राऊत आदी हिंदु–मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृत्त लिहीस्तोवर विसर्जन मिरवणुक शांततेत सुरु होती.

# जरांगेंना ऑडिओ क्लीप कुठून मिळाली? राऊतांनी टेप फोडणारा भाजपचा आमदार सांगितला



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – मनोज जरांगे यांनी नुकतीच एक ऑडिओ क्लीप समोर आणून महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून दिली होती. भाजपच्या अंतर्गत वतुर्ळातील संभाषणाची ही क्लीप मनोज जरांगे यांना कुठून मिळाली, असा प्रश्न त्यानंतर सर्वांना पडला होता. या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी एक महत्त्वाचा दावा केला आहे. ती ऑडिओ टेप भाजपच्या विधान परिषदेच्या आमदारानेच फोडली. तो आमदार मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणावेळी सतता त्यांच्यासोबत चर्चेसाठी असायचा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हा आमदार कोण, हे माहिती आहे, असेही संजय राऊत यांनी म्हटले. ते शनिवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत, गृहमंत्री आहेत, ते छोटे चाणक्य आहेत. त्यांना समजले पाहिजे. ऑडिओ क्लीपमध्ये ज्या लोकांमध्ये संभाषण सुरु आहे, ती भाजप आणि देवेंद्र फडणवीस यांची कोअर टीम आहे. मुख्यमंत्र्यांना वाटत नाही का या प्रकरणात एसआयटी स्थापन करुन चौकशी झाली पाहिजे. भाजपची कोअर टीम बोलतेय की, ५०० कोटी रुपये दिले.

मुख्यमंत्री कुणाला वाचवत आहेत? एकमेकांना अडचणीत आणण्यासाठी क्लीपचा वापर होत आहे. ५०० कोटींचा व्यवहार होऊनही चौकशी होणार नाही.

# पदभार स्वीकारताच अवघ्या काही तासात केरळच्या

## राज्यपालांनी लोक भवनात मांसाहारी जेवणावर थेट बंदी घातली




**९९ टक्के केरळची जनता मांसाहारी, काँग्रेसचाही जोरदार हल्लाबोल**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**केरळ** – पदभार स्वीकारल्यानंतर काही तासांतच, केरळचे नवनियुक्त राज्यपाल, ओम प्रकाश माथूर यांनी लोक भवनात मांसाहारी भोजन तयार करण्यावर आणि ते वाढण्यावर बंदी घातली आहे.

काँग्रेस आणि विरोधी पक्ष सीपीआय(एम)ने या निर्णयावर टीका केली. आता राज्यपालच ठरवतील का की काय खावे, असा प्रश्न काँग्रेसने उपस्थित केला. राज्यपाल कार्यालयातील सूत्रांनी सांगितले की, माथूर शाकाहारी आहेत, त्यामुळेच त्यांनी हा बदल केला आहे.

सूत्रांनी स्पष्ट केले की, लोक भवनातील कर्मचाऱ्यांच्या भोजनावर कोणतेही निर्बंध घालण्यात आलेले नाहीत. शुक्रवारी सकाळी माथूर यांनी केरळचे २९ वे राज्यपाल म्हणून शपथ घेतली. केरळ उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती सौमेन सेन यांनी त्यांना पदाची शपथ दिली.





